# - प्रेस नोट -

दि. १०/०६/२०२६

## गोरेगाव पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. ०९/०६/२०२६ रोजी ०४.०० वा. च्या सुमारास फिर्यादी अमीर कय्युम शेख वय-३३ वर्षे, धंदा - रा. ठी. गोरेगाव, मुंबई व त्यांचे मित्र धिरज यादव हे अंकुर बिल्डींग समोर रस्त्यावर विश्वकर्मा मार्ग, गोरेगाव मुंबई येथे गप्पा मारत बसले असताना जुन्या भांडनाचा राग मनात धरून  अटक आरोपी क्रमांक ०१ पुरुष वय-४१ वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०२ पुरूष वय-३०, अटक आरोपी क्रमांक ०३ पुरुष वय-२५, व अटक आरोपी क्रमांक ०४ पुरूष वय-२० यांनी संगनमताने फिर्यादीला शिवीगाळ करून हाताने मारहाण केली तसेच अटक आरोपी क्रमांक ०१ याने फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने  त्याच्याकडे असलेल्या कोयत्याने फिर्यादिच्या मानेवर वार केला परंतु तो वार फिर्यादीच्या हातावर झेलल्याने त्यांचा जीव वाचला , अटक आरोपींनी फिर्यादिचा मित्र धिरज यादव याला देखील कोयत्याने मारून गंभीर जखमी केले. तसेच त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन दि.०९/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.४६२/२६,कलम १०९(१),११८(१),११५(२), ३५२, ३५१(३),३(५), बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------